# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


## तांत्रिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी घ्यावयाच्या शैक्षणिक कर्जावर व्याजमाफीची योजना

<u>योजनेचा उदद्देश व स्वरुप</u> :- केंद्र शासनाने गुणवत्ताधारक आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी निधी अभावी व्यावसायीक तसेच तांत्रिक शिक्षणापासून वंचीत राहू नयेत, या सामाजिक उद्देशाने शैक्षणिक कर्जावर व्याजमाफीची योजना शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून लागू करण्याचे घोषित केले आहे. या योजनेनुसार विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या कालावधीत तसेच अभ्यासक्रम संपल्यावर १ वर्ष किंवा नोकरी लागल्यानंतर ६ महिने यापैकी जे आधी घडेल तोपर्यंतचे व्याज विद्यार्थ्यांच्या वतीने केंद्र शासन बँकांकडे भरणार आहे.

<u>लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी पात्रता :-</u>

१) सदर विद्यार्थी इयत्ता १२ वी नंतर तांत्रिक किंवा व्यवसायिक अभ्यासक्रमात शिकणारा असावा.

२) विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.४.५ लक्ष एवढया रकमेच्या आत असावे.

<u>कर्ज देणारी बँक :-</u> अनुसूचित बँक (शेडयुल्ड बँक)

<u>उत्पन्नाचे प्रमाणपत्र देणारा सक्षम प्राधिकारी</u> : संबंधित तालुक्याचे तहसिलदार.

योजनेची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या **www.education.nic.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-
(डॉ. सु. का. महाजन)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.